# प्रेस नोट दिनांक २३/०१/२०२४

## शहर गुन्हे शाखेकडून, मोटार सायकल चोरीचे ०४ गुन्हे उघड.

---

सोलापूर शहरातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेसाठी, शहर गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार पोना/१३७९ बापू साठे, पोशि/१७२९ सुभाष मुंढे, पोशि/१०७५ भारत पाटील, पोशि/१७१२ सैपन सय्यद असे सोलापूर शहर परिसरात, मोटार सायकल चोरीचे अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध घेत पेट्रोलिंग करत होते.

**अ)** त्यानुसार, दि. १८/०१/२०२४ रोजी बातमीदारामार्फत **पोना/१३७९ बापु साठे** यांना बातमी मिळाली की, रोहित रमेश साळुंखे, वय- २६ वर्षे, रा. कल्याण नगर भाग-३, आसरा ब्रिजजवळ, जुळे सोलापूर हा चोरीची मोटार सायकल घेवुन एका ठिकाणी थांबला आहे. त्यानंतर, **पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने,** मिळालेल्या बातमी प्रमाणे, इसम नामे - रोहित रमेश साळुंखे यास, दि. १८/०१/२०२४ रोजी सापळा लावुन ताब्यात घेतले.

त्यानंतर, रोहित रमेश साळुंखे याचेकडे पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने कौशल्यपुर्वक तपास केला असता, नमुद आरोपीने (१) कन्ना चौक, (२) गड्डा यात्रेत हरिभाई देवकरण शाळा, (३) हिरज, ता.उत्तर सोलापूर अशा ०३ ठिकाणाहून, प्रत्येकी एक याप्रमाणे, एकूण ०३ मोटार सायकली चोरी केल्याचे कबुल करुन, त्या चोरी केलेल्या ०३ मोटार सायकली काढून दिल्या. त्यानुसार, खालीलप्रमाणे ०३ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं./कलम | मो.सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | जोडभावी पेठ | गुरनं. १५/२०२४ भादंवि ३७९ | MH 13 CY 0384 | रु. 20,000/- |
| २ | सदर बझार | गुरनं. ३४/२०२४ भादंवि ३७९ | MH 13 BH 8829 | रु. 40,000/- |
| ३ | तालुका पो.ठाणे सोलापूर ग्रामीण | गुरनं. ४९७/२०२२ भादंवि ३७९ | MH 13 AE 0252 | रु. 20,000/- |

**ब)** त्याचप्रमाणे, दि. २०/०१/२०२४ रोजी **पोशि/१०७५ भारत पाटील** यांना बातमी मिळाली की, आनंद अशोक म्हेत्रे, वय- १९ वर्षे, रा. शांतय्या अनाथ आश्रम शाळेजवळ, २४४, व्यंकटेश नगर, एम.आय.डी.सी., सोलापूर हा चोरीची मोटार सायकल घेवुन विक्रीकरिता एका ठिकाणी थांबला आहे. त्यानंतर, **पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने,** मिळालेल्या बातमी प्रमाणे, इसम नामे - आनंद अशोक म्हेत्रे यास दि. २०/०१/२०२४ रोजी सापळा लावुन ताब्यात घेतले. त्यानंतर नमूद आरोपीकडे, पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे पथकाने कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही, व्यंकटेश नगर, एमआयडीसी, सोलापूर येथून चोरी केल्याचे कबुल केले. त्यामुळे, सदरची मोटार सायकल ही, त्याचे ताब्यातून जप्त केली आहे. त्यानुसार, नमूद आरोपी कडून खालीलप्रमाणे ०१ मोटार सायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं./कलम | मो.सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | एमआयडीसी | गुरनं. २१/२०२४ भादंवि ३७९ | MH 13 DC 5193 | रु. 30,000/- |

**अशा प्रकारे, सोलापूर शहर गुन्हे शाखेने, वरील प्रमाणे ०४ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणून, एकूण ०१,१०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदरची कामगीरी, मा.श्री.डॉ.राजेंद्र माने, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा. डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता.**


HONDA